# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

सायंकाळ

(पोलीस वार्तापत्र)

**दिनांक ०७.१०.२०२५ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथक व वाहतुक पोलीसांची संयुक्तीक कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०७.१०.२०२५ चे ०१.१० वा. ते ०४.४५ वा. चे दरम्यान, वाहतुक शाखा पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे कोराडी हद्दीत कोराडी नाका येथे ऑपरेशन यु—टर्न राबवीत असतांना, कोराडीकडुन नागपूरकडे एक काळ्या रंगाची स्कार्पियो गाडी भरधाव वेगाने व संशयीतरित्या येताना दिसल्याने तिला थांबवून, चालकास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव दानिश अबरार खान, वय ४० वर्ष, रा. प्लॉट नं. ३८, जाफर नगर, गिट्टीखदान, नागपूर असे सांगीतले. त्याचे वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता, गाडीमध्ये एम.डी सदृष्य पावडर दिसुन आली. यावरून गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना घटनास्थळी बोलाविले असता, त्यांनी नमुद वाहनाची बारकाईने पाहणी केली. वाहनामध्ये एका प्लास्टीक झिपलॉक पन्नीमध्ये ६ ग्रॅम एम.डी. (मेफेड्रॉन ड्रग्स) पावडर किंमती अंदाजे ३०,०००/—रू. ची मिळुन आली. आरोपीस सखोल विचारपूस केली असता, त्याने त्याचा साथिदार पाहिजे आरोपी प्रियांशू गजभिये, वय २७ वर्षे, रा. पावरग्रिड चौक, कपिलनगर, नागपूर याचेकडून आणल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, एक मोबाईल फोन व स्कार्पियो गाडी क्र. एम. एच. ४९ सि.एल. १७१७ असा एकुण किंमती अंदाजे १८,६५,०००/—रू. मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २२(ब), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, फिर्यादी पोउपनि. श्याम मिश्रा वाहतुक शाखा यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे कोराडी येथे मपोउपनि. बडवाईक यांनी आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव कोराडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. लोहीत मतानी, पोलीस उप आयुक्त (वाहतुक शाखा), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. शरद कदम, पोनि. गजानन गुल्हाने, पोउपनि. श्याम मिश्रा, नागेश पुन्नावाड, पोहवा. विनोद द्विवेदी, अरविंद गेडेकर, गणेश जोगेकर, विवेक अडाऊ, पोअं. राहुल पाटील, होमगार्ड मंगल मेश्राम, अमन कंगाली व राहुल यांनी केली.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ०१ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपींना अटक, ०६ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १९.०९.२०२५ चे १३.३० वा. ते दि. २०.०९.२०२५ चे ००.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी आदीत्य सिताराम टॅटू, वय २२ वर्षे, रा. वार्ड नं. ५, एस.बी.आय. बॅक जवळ, भिवापूर, जि. नागपूर यांनी त्यांची दुचाकी क्र.

एम.एच. ३१ सि.डब्ल्यू. ०८३९ किंमती १५,०००/—रू. ची ही पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत, छत्रपती चौक, मेट्रो स्टेशनचे पार्किंगमध्ये लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे प्रतापनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हेशाखा युनिट क्र. ०१ चे पोअं. कुणाल गेडाम यांनी टेक्नीकल ॲनालीसीस करून, आरोपी हे बालाघाट येथे असल्याचे निष्पन्न केले. त्याप्रमाणे युनिट चे अधिकारी व अंमलदार यांनी सायबर सेल चे विशेष सहकार्य घेवुन, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी नामे अतुल श्यामलाल भिसेन, वय २५ वर्षे, रा. परसवाडा, पोस्ट लिंगा, ता. जि. बालाघाट (म.प्र) यास बालाघाट येथुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने त्याचे साथिदार पाहिजे आरोपी क्र. २) अरविंद ३) अंकीत मडावी दोन्ही रा. शिवनी (म.प्र.) यांचेसह संगणमत करून, वर नमुद गुन्हयाव्यतीरिक्त पोलीस ठाणे सोनेगाव—०१, धंतोली—०१, गणेशपेठ—०१, प्रतापनगर—०१ व पोलीस ठाणे तिरोडा जि. गोंदीया—०१, असे एकुण ०६ वाहन चोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपीस चोरी केलेल्या वाहनांबाबत विचारपूस केली असता, त्याने आरोपी क्र. ४) यासीन अली गफुर अली, वय ४० वर्षे, रा. कटंगी, काहरी मोहल्ला, बालाघाट याचेकडे कटींग करीता दिल्याचे सांगीतले. आरोपी क्र. १ व ४ यांना गुन्हयात अटक करून, त्यांचे ताब्यातुन चोरी केलेले एकुण ०६ दुचाकी वाहने किंमती अंदाजे १,८०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी क्र. १ व ४ यांना मुद्देमालासह पुढील कारवाईकामी राणाप्रताप नगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. सचिन भोंडे, पोउपनि. विवेक झिंगरे, पोहवा. रविन्द्र अहीर, रविन्द्र खेडेकर, शरद चांभारे, सुनित गुजर, हेमंत लोनारे, नितीन वासनिक व पोअं. कुणाल गेडाम यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे यशोधरानगर :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०७.१०.२०२५ चे १४.२० वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, संगीता हायस्कुल समोर, विटा भट्टी चौक येथे हाफ बाहिचा रंगी—बेरंगी टि—शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला ईसम हा शस्त्रासह फिरत आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम दिसुन आल्याने, त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शेख अनवर शेख असलम, वय २३ वर्षे, रा. बंडू किराणा स्टोअर्स जवळ, कुंदनलाल गुप्ता नगर, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे

आत कमरेत एक लोखंडी चाकु किंमती अंदाजे १,०००/— रू. चा मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. रितेश दुधे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाठोडा :— प्राणांतीक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०७.१०.२०२५ चे ०७.३० वा. चे सुमारास, फिर्यादीची चुलत बहिण नामे कु. भाग्यश्री जियालाल टेंभरे, वय १७ वर्षे, रा. माँ अंबे कॉलोनी, जयस्वाल ईस्टेट ईस्ट पॉईन्ट शाळे जवळ, खरबी, वाठोडा, नागपूर ही तिच्या मोपेड गाडी क्र. एम.एच. ४९ झेड. ०७१८ ने ट्युशन क्लास करीता पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत गरीब नवाज चौकाकडुन खरबी चौकाकडे जात असतांना, बद्रीनाथ किराणा स्टोअर्स जवळ, सार्वजनीक रोडवर एका खाजगी पांढऱ्या रंगाची बस चालकाने त्याचे ताब्यातील बस भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे चुलत बहिणीचे मोपेडला धडक देवुन, तिला गंभीर जखमी करून पळून गेला. गंभीर जखमी हिला उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी महेन्द्र पुरनलाल टेंभरे, वय २९ वर्षे, रा. प्लॉट नं. ३०१, जिजा माता नगर—१, दुर्गा मंदीरचे मागे, खरबी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. गुंडेकर यांनी खाजगी बस चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे तहसिल :—** रोशनी कौसर वल्द मोहम्मद युनूस, वय २३ वर्षे, रा. अंसार नगर, मोमीनपूरा, बब्बू पान ठेल्या जवळ, नागपूर ही दिनांक ०२.१०.२०२५ रोजी ०९.०० वा. पासुन पोलीस ठाणे तहसिल हद्दीतुन राहते कोणाला काहीही न सांगता निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे लांब, अंगात— निळया रंगाचा सलवारकुर्ता व काळया रंगाचा बुरखा घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते.

**२) पोलीस ठाणे तहसिल :—** क्रिष्णा शंकर बावने, वय २९ वर्षे, रा. ईसापूर पोस्ट बाबदेव, ता. मौदा, जि. नागपूर हा दिनांक ३०.०९.२०२५ रोजी ०७.३० वा. पासुन पोलीस ठाणे तहसिल हद्दीतुन राहते कोणाला काहीही न सांगता निघुन गेला. घरी परत आला नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे, अंगात— फिक्कट निळया रंगाचा फुल बाहिचा शर्ट व निळया रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतो.


रोशनी


क्रिष्णा

**(ईतर)**

**मा. न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा/समन्स प्रसिध्द केला आहे. आरोपी/साक्षदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा.न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टचे नाव | केस क्र. | कलम | नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ०८, नागपुर. | ३०२८३४/२००७ | कलम ३५३, ५०४, ५०६ भा.दं.वि. | सुरज शांताराम जांगडे, रा. नविन सुभेदार ले–आउट, किशोर मेश्राम यांचे घरी किरायाने, नागपुर. | ०९.१०.२०२५ |
| २. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ०२, नागपुर. | ८९/२००२ | कलम ४४८, ५०६(ब) भा. दं.वी | राजु मिस्त्री उर्फ संबध खान वल्द वहीद खान, वय २२ वर्ष रा. मोठा ताजबाग, सिंधीबन, सक्करदरा, नागपुर. | ०९.१०.२०२५ |
| ३. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. १३, नागपुर. | २२१/१९८५ | कलम ३५४ भा.दं.वी | १) आकाश एकनाथ मेश्राम, २) अशोक उर्फ बोंडा कन्हैयालाल मिश्रा दोन्ही रा. शहीद चौक, भगवती मंदीर जवळ, बिनाकी मंगळवारी, ईतवारी, नागपुर. | १०.१०.२०२५ |
| ४. | मा. १६ सह. दिवानी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०५०२९६/२००१ | कलम ८२ सि.आर.पी.सी. प्रमाणे | १) अब्दुल रहीम अब्दुल रहेमान, रा. ईतवारी दही बाजार, नागपूर २) चंद्रकांत सखाराम बाजीरावकर, रा. साईनगर, प्रेमनगर, नागपुर. ३) शेख लतीफ शेख हनीफ रा. शांतीनगर कॉलोनी, फुलेवाले बाबा मठा समोर, नागपूर | १३.१०.२०२५ |
| ५. | मा. १६ सह. दिवानी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०३६४१/२०१३ | कलम ८२ सि.आर.पी.सी. प्रमाणे | गुरूजेपाल सिंग उर्फ सरदार सिधू, रा. धावडे मोहल्ला राजेश ठाकूरचे घरी, नागपुर. | १४.१०.२०२५ |
| ६. | मा. अति. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०००७६/२०१६ | कलम ३, ४, ७, ८ अ.व्या.प्र.का | इंदिराबाई हटेसिंग कालखोर/ठाकूर वय ६५ वर्ष रा. गंगा जमुना वस्ती, लकडगंज, नागपुर. | १५.१०.२०२५ |
| ७. | मा. १६ सह. दिवानी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०५००८५/१९९६ | कलम ३२४ भा.दं.वी | पंकज निंबाजी मांडळकर, रा. चंपा चौक, गंगा जमुना, लकडगंज, नागपुर. | १८.१०.२०२५ |
| ८. | मा. १६ सह. दिवानी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०५०२३७/१९९५ | कलम ३२४ भा.दं.वी | राजु वल्द राधेलाला वर्मा, रा. कुंदनलाल गुप्ता नगर, निखारेचे घराजवळ, लकडगंज, नागपुर. | १८.१०.२०२५ |

**स्वा/–**

**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप–निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

# वाहतुक शाखेची प्रेसनोट -१

कडबी चौक ते मोतीबाग रेल्वे क्रॉसींग, मोतीबाग रेल्वे क्रॉसींग ते गोळीबार चौके, येथे रेल्वे ओव्हर ब्रिजचे काम अर्जदार, P. VENKATA RAMANAIAH ENGINEERS & CONTRACTORS & PVT LTD धंतोली, वर्धा रोड, नागपुर या कपंनीद्वारे उड्डाणपुलाचे बांधकाम करण्यात येणार आहे. सदरच्या रस्त्यावर दिवसभर व्यस्त वाहतूकीची वर्दळ असते. रस्त्यांवर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्यावर प्रतिबंध व्हावा करीता या दरम्यान रोडवर वाहतूकीचे दृष्टीकोनातुन खालील प्रमाणे अधिसूचना काढण्यात आली आहे.

**कडबी चौक ते गोळीबार चौक उड्डणपुलाचे काम सुरू असतांना खालील प्रमाणे वाहतूक वळविण्यात येत आहे.**

१. कडबी चौक ते मोतीबाग रेल्वे क्रॉसींग रेल्वे ओव्हर ब्रिज बांधकाम दरम्यान दुचाकी वाहने बेझनबाग चौक येथुन बेलीशॉप कॉर्टर या मार्गाचा वापर करतील. इतर लहान चारचाकी वाहने ही कडबी चौक, सदर मंगळवारी बाजार, मेश्राम पुतळा, किंवा सदर मंगळवारी बाजार चौक, डावे वळण घेवून गड्डीगोदाम रोड, पूढे आवश्यकतेनुसार जाईल. तसेच प्रवासी वाहने व इतर जड वाहतूक ही खोब्रागडे चौक, मानकापुर चौक, पागलखाना चौक, मेश्राम पुतळा एलआयसी चौक अशी ये-जा करेल.

२. गोळीबार चौक, दोसर भवन चौक कडुन मोतीबाग रेल्वे क्रॉसींगकडे येणारी वाहतूक ही मेयो हॉस्पीटल, रामझुला, एल.आय.सी. चौक, पुढे आवश्यकतेनुसार कडबी चौक अशी जाईल.

३. संत्रा मार्केट कडुन येणारी गार्ड लाईनकडे जाणारी संपुर्ण वाहतूक ही बंद करण्यात येत असुन फक्त दुचाकी वाहने ही रामझुला चे खालून उजवे वळण घेवुन दोसर भवन चौक, भगवाघर चौक, मोमीनपूरा येथुन डावे वळण घेवुन पुढे कडबी चौकाकडे जाईल. इतर चारचाकी वाहने ही रामझुला येथुन रामझुला, युटर्न घेवुन एल.आय.सी. चौक, पुढे आवश्यकतेनुसार कडबी चौक अशी जाईल.

**गार्ड लाईन ते गोळीबार चौक या दरम्यान उड्डाणपुलाचे बांधकाम करतांना खालील प्रमाणे वाहतूक वळविण्यात येत आहे.**

- कडबी चौकाकडुन गोळबार चौकाकडे जाणारी सर्व प्रकारची चारचाकी वाहने ही १० नं. पुलीया, कमाल चौक मार्गे पुढे आवश्यकतेनूसार जातील.
- गोळीबार चौकाकडुन कडबी चौकाकडे जाणारी संपुर्ण चारचाही वाहने ही कमाल चौक डवे वळण, आवळे बाबु चौक उजवे वळण, १० नं. पुलीया डावे वळण घेवून बेझनबाग मार्गे कडबी चौकाकडे जाईल.
- गार्ड लाईन ते गोळीबार चौक या दरम्यान दुचाकी व तिनचाकी सर्व प्रकारचे वाहनांना या मार्गावर प्रवेश राहील.
- सर्व प्रकारचे जड वाहतूकीस या मार्गावर बंदी राहील. फक्त कामाचे सबंधाने येणारे जड वाहनांना परवानगी असल्यास प्रवेश राहील.

**सदर अधिसूचना दि. ०९.१०.२०२५ ते ०८.११.२०२५ पर्यत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

# वाहतुक शाखेची सुधारीत प्रेसनोट –2
## (जड वाहनाचे रहदारीचे नियमनाबाबत)

नागपूर शहराबाहेरून येऊन परस्पर दुसऱ्या ठिकाणी जाणाऱ्या जड वाहनांसाठी ज्या ठिकाणी बाह्य गोल रस्ता (आऊटर रिंग रोड) उपलब्ध असतांना, त्याचा वापर न करता नागपूर शहरात अवजड वाहने प्रवेश करत असल्याने अपघात होत आहे, नागपूर शहरात मागील 05 वर्षातील अपघात पाहता (सन 2020 ते सन 2025 आजपावेतो) जड वाहनांनी एकुण 422 प्राणांतिक अपघात झाले असुन, त्यामध्ये 457 लोकांचा मृत्यु पावले आहे, तसेच 279 गंभीर अपघात झाले आहे त्यामध्ये 563 लोक गंभीर जखमी झाले असल्याने त्यांना कायमचे अपगंत्व आले आहे, किरकोळ अपघात 180 झाले असुन त्यामध्ये 247 लोक किरकोळ जखमी झाले आहे, सदरचे जास्तीत जास्त अपघात हे जड वाहनांना शहरामध्ये प्रवेश दिल्यानंतर झाले आहेत. वरील संपूर्ण बांबीचे गांर्भीय लक्षात घेता त्याकरीता अधिसुचनेत अंशतः बदल करणे आवश्यक आहे. तसेच जड वाहतूकी करीता नवीन आउटर रिंग रोड तयार झाले असुन ते सुरू करण्यात आले आहे म्हणुन सदर जड वाहतूक नवीन आउटर रिंग रोड ने वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

### अ) नागपूर शहराबाहेरून येऊन परस्पर दुसऱ्या ठिकाणी जाणारी जड वाहने.

1) अमरावती– नागपूर (एन.एच–53) कडून जबलपूर कडे जाणारी सर्वप्रकारचे जड वाहने आउटर रिंग रोड ने गोंडखैरी टी पॉईन्ट येथुन डावे वळण घेवून नवीन तयार करण्यात आलेल्या अंडर पास ने आउटर रिंगरोड चारपदरी मार्गाने सरळ खडका टोल नाका मार्गे, झीरो समृध्दी सर्कल कडून एन.सी.आय. हॉस्पीटल चे समोरुन पांजरा टोल नाका ओलांडून वाहतुक परिमंडळ अजनी, सक्करदरा, कामठी यांचे हद्दीतुन पुढे कामठी, कन्हान मार्गे जाईल.

2) अमरावती– नागपूर (एन.एच–53) कडुन वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ, हैद्राबाद, उमरेड कडे जाणारी सर्वप्रकारचे जड वाहने आउटर रिंग रोड ने गोंडखैरी टी पॉईन्ट येथुन डावे वळण घेवून नवीन तयार करण्यात आलेल्या अंडर पास ने आउटर रिंगरोड चारपदरी मार्गाने सरळ खडका टोल नाका मार्गे, झीरो समृध्दी सर्कल कडून एन.सी.आय. हॉस्पीटल चे समोरुन वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ, हैद्राबाद कडे जाणारे जड वाहने वर्धा रोड आउटर रिंगरोड वरील ओव्हर ब्रीज ओलांडल्यांनतर पहिले डावे वळण घेवून वर्धा रोड या मुख्य मार्गावरुन वर्धा मार्गे चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ तसेच हैद्राबाद कडे प्रस्थान करतील. तसेच उमरेड येथे जाणारे जड वाहने पांजरा टोल नाका ओलांडून वाहतुक परिमंडळ अजनी, सक्करदरा यांचे हद्दीतुन पुढे प्रस्थान करतील.

3) वर्धा कडुन भंडारा, रायपूर कलकत्ता जबलपूर कडे जाणारे सर्वप्रकारचे जड वाहने डोंगरगाव मार्गाने सरळ जामठा मार्गे वर्धा महामार्गावरील रानीकोटी चे अलीकडील कटींग ने डावे वळण घेवून नवीन आउटर रिंग रोड ने जड वाहने पांजरा टोल नाका ओलांडून वाहतुक परिमंडळ अजनी, सक्करदरा यांचे हद्दीतुन पुढे प्रस्थान करतील.

4) वर्धा रोड महामार्गाने अमरावती कडे जाणारी सर्वप्रकारचे जड वाहने डोंगरगाव मार्गाने सरळ जामठा मार्गे वर्धारोड आउटर रिंगरोडचे अलीकडुन पहिले डावे वळण घेवुन आउटर रिंगरोड वर जाईल व तेथुन एन.सी.आय हॉस्पीटल, झीरो समृध्दी सर्कल ने खडका टोल नाका मार्गे गोंडखैरी टी पॉईंट येथून डावे वळण घेवून एन.एच 53 वर अमरावती कडे प्रस्थान करतील.

5) कलकत्ता, जबलपुर, रायपुर, भंडारा कडून वर्धा किंवा अमरावती कडे जाणारी सर्वप्रकारचे जड वाहने कन्हान कामठी चारपदरी नवीन आऊटर रिंगरोड मार्गे कापसी ओव्हर ब्रिज, विहीरगाव येथून सरळ

वर्धा महामार्गावरिल ओव्हर ब्रिज अलीकडून वर्धा कडे जाणा–या वाहनांनी पहिले डावे वळण मार्गावरून चारपदरी वर्धा महामार्गावरून प्रस्थान करावे. तसेच अमरावती कडे जाणारे वाहनांनी वर्धा महामार्गावरील ओव्हर ब्रिज ओलांडून सरळ गोंडखैरी टि पॉइन्ट येथून डावे वळण घेवून अमरावती मार्गे प्रस्थान करतील.

6) वर्धा मार्गे व्हाया नागपूर छिंदवाडा, भोपाल व त्यापुढे जाणारे सर्वप्रकारचे जड वाहने वर्धा मार्गे व्हाया नागपूर, छिंदवाडा, भोपाल व त्यापुढे जाणारे सर्वप्रकारचे जड वाहने डोंगरगाव मार्गाने सरळ जामठा मार्गे आक्सीजन बर्ड पार्क येथुन डावे वळण घेवुन आउटर रिंगरोड वर जाईल व तेथुन एन.सी.आय हॉस्पीटल, झीरो समृध्दी सर्कल ने खडका टोल नाका मार्गे गोंडखैरी टि पॉईंट वरून नवीन आउटर रिंगरोड ने कोराडी पॉवर हाउस येथुन डावे वळण घेवून छिंदवाडा भोपाल व त्यापुढे प्रस्थान करतील.

7) अमरावती मार्गे मध्यप्रदेश (भोपाल, बैतुल व छिंदवाडा) कडे जाणारी सर्वप्रकारची जड वाहने अमरावती मार्गे मध्यप्रदेश (भोपाल, बैतूल व छिंदवाडा) कडे जाणारी सर्वप्रकारचे जड वाहने गोंडखैरी टी पॉईंट येथून डावे वळण घेवून गोंडखैरी टि पॉईंट वरून नवीन आउटर रिंगरोड ने कोराडी पॉवर हाउस येथुन डावे वळण घेवून पुढे बैतूल, छिंदवाडा व भोपाल कडे प्रस्थान करतील.

8) मध्यप्रदेश (भोपाल, बैतुल, छिंदवाडा) कडून व्हाया नागपूर अमरावती किंवा वर्धा कडे जाणारी सर्वप्रकारचे जड वाहने भोपाल, बैतुल, छिंदवाडा (मध्यप्रदेश) कडून अमरावती किंवा वर्धा कडे जाणारी सर्वप्रकारचे जड वाहने कोराडी पॉवर हाऊस येथून उजवे वळण घेवून नविन रिंग रोड वरून सरळ गोंडखैरी टी पॉईंट येथुन उजवे वळण घेवुन अमरावती मार्गे जातील. तसेच वर्धा येथे जाणारे वाहनांनी गोंडखैरी टि पॉइंन्ट मार्गे सरळ आउटर रिंग रोड चारपदरी मार्गावरून नागपूर वर्धा महामार्गावरील ओव्हर ब्रिज ओलांडून झीरो समृध्दी सर्कल, रानी कोठी नंतर पहिले डावे वळण घेवून चारपदरी वर्धा महामार्गावरून डावे वळण घेवून सरळ मार्गाचा वापर करावा.

9) भोपाल, बैतुल, छिंदवाडा (मध्यप्रदेश) कडून उमरेड रोड, भंडारा, रायपुर किंवा जबलपुर कडे जाणारे सर्वप्रकारचे जड वाहने भोपाल, बैतुल, छिंदावाडा (मध्यप्रदेश) कडून उमरेड, भंडारा, रायपुर किंवा जबलपूर कडे जाणारे सर्वप्रकारचे जड वाहनांने कोराडी पॉवर हाऊस डावे वळण घेवून आऊटर रिंगरोड वरून कापसी पुलीया ओलांडून उमरेड, भंडारा, रायपुर सरळ पुढे प्रस्थान करतील. तसेच जबलपुर कडे जाणारे सर्वप्रकारचे जड वाहनांनी धारगाव डावे वळण घेवून सरळ कामठी–कन्हान मार्गे प्रस्थान

करतील.

10) वर्धा, कडून नागपूर शहरातील एम.आय.डी.सी. येथे येणारी जड वाहने वर्धा कडुन नागपूर शहरातील एमआयडीसी येथे येणारी जड वाहने डोंगरगाव मार्गाने सरळ जामठा मार्गे ऑक्सीजन बर्ड पार्क येथनू डावे वळण घेवून कॅन्सर हॉस्पीटल चे समोरुन पुढे झीरो समृध्दी सर्कल – सरळ खडका टोल नाका मार्गे गोंडखैरी टी पॉईंट येथे येईल त्यापुढे नागपूर शहरात जड वाहनांना प्रवेश बंदी असल्यामुळे सदर वाहनांना प्रवेश सुरु असलेल्या नमुद कालावधी मध्ये अमरावती रोड ने वाडी टी पॉईंट येथुन उजवे वळण घेवुन एम.आय.डी.सी कडे प्रस्थान करता येईल.

## ब) अमरावती कडून नागपूर शहरातील एम.आय.डी.सी.येथे येणारी जड वाहने

1) अमरावती मार्गे सरळ वाडी टि पॉइंन्ट (राहुल हॉटेल) येथून उजवे वळण मार्गाचा वापर करावा.

क) भोपाल, बैतुल, छिंदवाडा ( मध्यप्रदेश ) कडून नागपूर शहरातील एम.आय.डी.सी. येथे येणारी जड वाहने

1) भोपाल, बैतुल, छिंदवाडा (म.प्र.) कडून येणारी जडवाहने कोराडी पॉवर हाऊस येथुन उजवे वळण घेवुन नविन आउटर रिंग रोड वरून गोंडखैरी टी पॉईंट येथुन उजवे वळण घेवून वाडी टी पॉइंन्ट (राहुल हॉटेल) येथून डावे वळण मार्गाचा वापर करावा.

ड) जबलपुर व भंडारा कडून नागपूर शहरातील एम.आय.डी.सी. येथे येणारी जड वाहने

1) जबलपुर व भंडारा कडून नागपूर एमआयडीसी कडे येणारे सर्वप्रकारचे जड वाहनांनी कापसी ओव्हर ब्रिज, जामठा उड्डाणपुल, झिरो सर्कल अमरावती मार्गावरील गोंडखैरी टि पॉइंन्ट येथून उजवे वळण घेवून सरळ वाडी टि पॉइंन्ट (राहुल हॉटेल) येथून उजवे वळण घेवून सरळ मार्गाचा वापर करतील.

'ब ते ड'' मध्ये नमूद प्रमाणे वाहनांना आऊटर रिंगरोडवरून नागपूर शहर हद्दीत प्रवेश करण्याकरीता सकाळी 06:00 ते 12.00 वा. आणि 16.00 वा. ते 22:00 वा. पावेतो बंदी राहील.

**इ) खाली नमूद ठिकाणी दळणवळणासाठी जाणाऱ्या जडवाहनांना दररोज सकाळी 06.00 ते 12.00 वा. आणि 16.00 वा.ते 22.00 वा. पावेतो प्रवेश बंदी राहील.**

1) **भारतीय खाद्य निगम गोदाम अजनी :–**

• अमरावती कडून शहरात प्रवेश करून भारतीय खाद्य निगम गोदाम, अजनी या ठिकाणी येणारी जडवाहने गोंडखैरी टी पॉईंट येथुन उजवे वळण घेवुन नवीन आउटर रिंगरोड वरून समृध्दी झिरो सर्कल वरून माउली कटिंग येथुन डावे वळण घेवुन रानी कोठी, चिंचभवन बस स्टॉप, हॉटेल प्राईड चौक, अजनी नाका येथुन उजवे वळण घेवुन एफ.सी.आय. गोडाउन येथे जातील. **तसेच एफ.सी. आय. गोडावुन ते अन्न व नागरी पुरवठा विभागाचे गोदाम, सिव्हील लाईन्स** या ठिकाणी जाणारे जडवाहन एफ.सी.आय. गोडावून येथून अजनी चौकातून उजवे वळण घेवून कृपलानी टर्निंग व तेथून डावे वळण घेवून माता कचेरी चौक येथून उजवे वळण घेवून काचीपुरा चौक, अलंकार टॉकीज चौक, भोले पेट्रोलपंप वरून पुन्हा उजवे वळण घेवून महाराजबाग चौक येथून डावे वळण घेवून गुप्ता हाऊस जवळून उजवे वळण घेवून अन्न व नागरी पुरवठा विभागाचे गोदामात जातील. परतीचा सुद्धा हाच मार्ग राहील.

• भोपाल व छिंदवाडा कडून शहरात प्रवेश करून भारतीय खाद्य निगम गोदाम, अजनी या ठिकाणी येणारी जडवाहने कोराडी पॉवर हाऊस येथुन उजवे वळण घेवुन नविन आउटर रिंग रोड वरून गोंडखैरी टी पॉईंट येथुन उजवे वळण घेवुन नवीन आउटर रिंगरोड वरून समृध्दी झिरो सर्कल वरून माउली कटिंग येथुन डावे वळण घेवुन रानी कोठी, चिंचभवन बस स्टॉप, हॉटेल प्राईड चौक, अजनी नाका येथुन उजवे वळण घेवुन एफ.सी.आय. गोडाउन येथे जातील. तसेच एफ.सी. आय. गोडउन ते अन्न व नागरी पुरवठा विभागाचे गोदाम, सिव्हील लाईन्स या ठिकाणी जाणारे जड वाहन एफ.सी.आय. गोडावून येथून अजनी चौकातून उजवे वळण घेवून कृपलानी टर्निंग व तेथून डावे वळण घेवून माता कचेरी चौक येथून उजवे वळण घेवून भोले पेट्रोलपंप वरून पुन्हा उजवे वळण घेवून महाराजबाग चौक येथून डावे वळण घेवून गुप्ता हाऊस तेथून उजवे वळण घेवून अन्न व नागरी पुरवठा विभागाचे गोदामात जातील. परतीचा सुद्धा हाच मार्ग राहील.

• वर्धा, उमरेड, भंडारा, जबलपुर कडून शहरात प्रवेश करून भारतीय खाद्य निगम गोदाम, अजनी या ठिकाणी येणारी जडवाहने कापसी पुलीया येथून, हैद्रबाद रिंगरोडने पांजरा टोल नाका, हैद्राबाद कटिंग, माऊली कटिंग येथुन डावे वळण घेवुन ऑक्सीजन बर्ड पार्क कटिंग येथुन डावे वळण घेवुन रानी कोठी, चिंचभवन बस स्टॉप, हॉटेल प्राईड चौक, अजनी नाका येथुन उजवे वळण घेवुन एफ.सी.आय. गोडाउन येथे

जातील. तसेच एफ.सी. आय. गोडउन ते अन्न व नागरी पुरवठा विभागाचे गोदाम, सिव्हील लाईन्स या ठिकाणी जाणारे जडवाहन एफ.सी.आय. गोडावून येथून अजनी चौकातून उजवे वळण घेवून कृपलानी टर्निंग व तेथून डावे वळण घेवून माता कचेरी चौक येथून उजवे वळण घेवून भोले पेट्रोलपंप वरून पुन्हा उजवे वळण घेवून महाराजबाग चौक येथून डावे वळण घेवून गुप्ता हाऊस तेथून उजवे वळण घेवून अन्न व नागरी पुरवठा विभागाचे गोदामात जातील. परतीचा सुद्धा हाच मार्ग राहील.

**2) रेल्वे मालधक्का, संत्रा मार्केट व शासकीय गोदाम संत्रा मार्केट –**

• **अमरावती कडून शहरात प्रवेश करून रेल्वे मालधक्का, संत्रा मार्केट व शासकीय गोदाम संत्रा मार्केट** या ठिकाणी रेल्वे पार्सल माल घेवून येणारी जडवाहने गोंडखैरी टी पॉईंट येथुन उजवे वळण घेवुन नवीन आउटर रिंगरोड वरून समृध्दी झिरो सर्कल वरून माउली कटिंग येथुन डावे वळण घेवुन रानी कोठी, चिंचभवन बस स्टॉप, हॉटेल प्राईड चौक, अजनी नाका येथुन कृपलानी चौक, रहाटे कॉलोनी चौक येथुन उजवे वळण घेवुन कॉग्रेस नगर चौक, धंतोली अंडरब्रीज, सरदार पटेल चौक येथुन डावे वळन घेवून मोक्षधाम चौक, कॉटन मार्केट चौक सरळ रेल्वे मालधक्का संत्रा मार्केट येथे जातील. परतीचा सुद्धा हाच मार्ग राहील.

• **भोपाल व छिंदवाडा कडून शहरात प्रवेश करून भारतीय रेल्वे मालधक्का, संत्रा मार्केट व शासकीय गोदाम संत्रा मार्केट** या ठिकाणी येणारी जडवाहने कोराडी पॉवर हाऊस येथुन उजवे वळण घेवुन नविन आउटर रिंग रोड वरून गोंडखैरी टी पॉईंट समृध्दी झिरो सर्कल वरून माउली कटिंग येथुन डावे वळण घेवुन रानी कोठी, चिंचभवन बस स्टॉप, हॉटेल प्राईड चौक, अजनी नाका कृपलानी चौक, रहाटे कॉलोनी चौक येथुन उजवे वळण घेवुन, कॉग्रेस नगर चौक, धंतोली अंडरब्रीज, सरदार पटेल चौक येथुन डावे वळन घेवून मोक्षधाम चौक, कॉटन मार्केट चौक सरळ रेल्वे मालधक्का संत्रा मार्केट येथे जातील. परतीचा सुद्धा हाच मार्ग राहील.

• **जबलपुर, भंडारा, उमरेड, वर्धा, कडून शहरात प्रवेश करून भारतीय रेल्वे मालधक्का, संत्रा मार्केट व शासकीय गोदाम संत्रा मार्केट** या ठिकाणी येणारी जडवाहने कापसी पुलीया येथून, हैद्रबाद रिंगरोडने पांजरा टोल नाका, हैद्राबाद कटिंग, माऊली कटिंग येथुन डावे वळण घेवुन ऑक्सीजन बर्ड पार्क कटिंग येथुन डावे वळण घेवुन रानी कोठी, चिंचभवन बस स्टॉप, हॉटेल प्राईड चौक, अजनी नाका कृपलानी चौक, रहाटे कॉलोनी चौक येथुन उजवे वळण घेवुन, कॉग्रेस नगर चौक, धंतोली अंडरब्रीज, सरदार पटेल चौक येथुन डावे वळन घेवून मोक्षधाम चौक, कॉटन मार्केट चौक सरळ रेल्वे मालधक्का संत्रा मार्केट येथे जातील. परतीचा सुद्धा हाच मार्ग राहील.

**3) राज्य शासनांचे कामठी रोडवरील गोदाम ( लालगोदाम )**

• **अमरावती कडून शहरात प्रवेश करून राज्य शासनांचे कामठी रोडवरील गोदाम (लालगोदाम)** या ठिकाणी येणारी जडवाहने गोंडखैरी टी पॉईंट येथून नवीन आउटर रिंगरोड वरून कोराडी पॉवर हाऊस येथुन सरळ खैरीगाव कामठी रोड येथुन डावे वळण घेवून कामठी रोडने भिलगाव, नाका नं. 2 सरळ ऑटोमोटिव्ह चौक येथुन उजवे वळण घेवुन कामगार नगर चौक, तथागत चौक येथुन डावे वळण घेवुन पाटणकर चौक सरळ लाल गोदाम येथे जातील. परतीचा सुद्धा हाच मार्ग राहील.

• **भोपाल व छिंदवाडा कडून शहरात प्रवेश करून राज्य शासनांचे कामठी रोडवरील गोदाम (लालगोदाम)** या ठिकाणी येणारी जडवाहने कोराडी पॉवर हाऊस येथुन डावे वळण घेवनु नवीन आउटर

रिंग रोडवरून खैरीगाव कामठी रोड येथुन डावे वळण घेवून कामठी रोडने भिलगाव, नाका नं. 2 सरळ ऑटोमोटिव्ह चौक येथुन उजवे वळण घेवुन कामगार नगर चौक, तथागत चौक येथुन डावे वळण घेवुन पाटनकर चौक सरळ लाल गोदाम येथे जातील. परतीचा सुद्धा हाच मार्ग राहील.

• **जबलपुर, भंडारा, उमरेड, वर्धा, कडून शहरात प्रवेश करून राज्य शासनांचे कामठी रोडवरील गोदाम (लालगोदाम)** या ठिकाणी येणारी जडवाहने कापसी पुलावरून उजवे वळण घेवुन जबलपूर आउटर रिंगरोडने धारगाव येथून नवीन आउटर रिंगरोड वरून खैरीगाव कामठी रोड वरून डावे वळण घेवुन कामठी रोडने भिलगाव, नाका नं. 2 येथुन सरळ ऑटोमोटिव्ह चौक येथुन उजवे वळण घेवुन कामगार नगर चौक, तथागत चौक येथुन डावे वळण घेवुन पाटनकर चौक सरळ लाल गोदाम येथे जातील. परतीचा सुद्धा हाच मार्ग राहील.

**4) ट्रान्सपोर्टनगर फ्रि झोन व सेन्ट्रल वेअर हाऊस, वर्धमाननगर**

• **अमरावती, वर्धा, उमरेड, भंडारा व जबलपुर कडून शहरात प्रवेश करून ट्रान्सपोर्टनगर फ्रि झोन व सेन्ट्रल वेअर हाऊस, वर्धमाननगर** या ठिकाणी येणारी जडवाहने कापसी पुल येथून पारडी नाका चौक, जुना पारडी नाका चौकातून सोनबानगर रेल्वे क्रॉसिंग सरळ जावून डावे वळन घेवू सेन्ट्रल वेअर हाऊस, व सरळ हल्दीराम फॅक्ट्री समोरून पुढे जावून उजवीकडे ट्रान्सपोर्टनगर फ्रि झोन या ठिकाणी जाईल.

• **भोपाल व छिंदवाडा कडून शहरात प्रवेश करून ट्रान्सपोर्टनगर फ्रि झोन व सेन्ट्रल वेअर हाऊस, वर्धमाननगर** या ठिकाणी येणारी जडवाहने कोराडी पॉवर हाऊस येथुन डावे वळण घेवुन नवीन आउटर रिंग रोडवरून खैरीगाव कामठी रोड, धारगाव येथून उजवे वळण घेवुन कापसी पुलावरून उजवे वळण घेवुन जुना पारडी नाका चौक उजवे वळन घेवून सोनबानगर रेल्वे क्रॉसिंग सरळ जावून डावे वळन घेवून सेन्ट्रल वेअर हाऊस, व सरळ हल्दीराम फॅक्ट्री समोरून पुढे जावून उजवीकडे ट्रान्सपोर्टनगर फ्रि झोन या ठिकाणी जाईल.

5) **इतवारी व मारवाडी चौक येथील धान्यबाजार व व्यावसाईक प्रतिष्ठाने :–**

• **अमरावती, वर्धा, उमरेड, भंडारा व जबलपुर कडून शहरात प्रवेश करून इतवारी, मारवाडी चौक** या ठिकाणी आउटर रिंगरोडने येणारी जडवाहने कापसी पुल येथून पारडी उड्डाणपुल, वर्धमान नगर पॉवर हाउस चौक पासून जुना भंडारा रोडने पो.स्टे. लकडगंज, सुनिल हॉटेल सरळ जुना मोटार स्टॅन्ड व तेथून उजवे वळण घेवून इतवारी, मारवाडी चौक येथे जातील. हाच परतीचा मार्ग राहील.

• **भोपाल व छिंदवाडा कडून शहरात प्रवेश करून इतवारी, मारवाडी चौक** या ठिकाणी आउटर रिंगरोडने येणारी जडवाहने कोराडी पॉवर हाऊस येथुन डावे वळण घेवुन नवीन आउटर रिंग रोडवरून खैरीगाव कामठी रोड, धारगाव येथून उजवे वळण घेवुन कापसी पुलावरून उजवे वळण घेवुन पारडी उड्डाणपुल, वर्धमान नगर पॉवर हाउस चौक येथुन उजवे वळन घेवून जुना भंडारा रोडने पो.स्टे. लकडगंज, सुनिल हॉटेल सरळ जुना मोटार स्टॅन्ड व तेथून उजवे वळण घेवून इतवारी, मारवाडी चौक येथे जातील. हाच परतीचा मार्ग राहील.

6) **गांधीबाग येथील ट्रान्सपोर्ट बुकींग ऑफिस व होलसेल कपडा मार्केट :–**

• **अमरावती, वर्धा, उमरेड, भंडारा व जबलपुर कडून** शहरात **प्रवेश करून** गांधीबाग, ट्रान्सपोर्ट बुकींग ऑफिसेस व होलसेल कापडा मार्केट याठिकाणी आउटर रिंगरोडने येणारी जड वाहने कापसी पुल

येथून पारडी उड्डाणपुल, वर्धमान नगर पॉवर हाउस चौक पासुन जूना भंडारा रोडने पोलीस ठाणे लकडगंज, सुनिल हॉटेल व तेथून डावे वळण घेवून टेलिफोन एक्सचेंज चौक व तेथून उजवे वळण घेवून सेन्ट्रल एव्हेन्यू मार्गे सोना रेस्टॉरेन्ट चौक व तेथून उजवे वळण घेवून गांधीबाग येथे जातील. परतीचा सुद्धा हाच मार्ग राहील.

• **भोपाल व छिंदवाडा कडून शहरात प्रवेश करून** गांधीबाग, ट्रान्सपोर्ट बुकींग ऑफिसेस व होलसेल कापडा मार्केट या ठिकाणी आउटर रिंगरोडने येणारी जडवाहने कोराडी पॉवर हाऊस येथुन डावे वळण घेवुन नवीन आउटर रिंग रोडवरून खैरीगाव कामठी रोड, पवनगाव येथून उजवे वळण घेवुन कापसी पुलावरून उजवे वळण घेवुन पारडी उड्डाणपुल, वर्धमान नगर पॉवर हाउस चौक पासुन जुना भंडारा रोडने पो.स्टे. लकडगंज, सुनिल हॉटेल व तेथून डावे वळण घेवून टेलिफोन एक्सचेंज चौक व तेथून उजवे वळण घेवून सेन्ट्रल एव्हेन्यू मार्गे सोना रेस्टॉरेन्ट चौक व तेथून उजवे वळण घेवून गांधीबाग येथे जातील. परतीचा सुद्धा हाच मार्ग राहील.

**परंतू एकाच वेळी पांच पेक्षा जास्त ट्रक गांधीबाग ऐरीयात येणार नाही. तसेच 30 कि. मी प्रति तासाचे वर वेगाने वाहन चालविणार नाही.**

7) शहरात प्रवेश करून **मिहान परिसरात** आवागमन करणारे जड वाहतूक हि वर्धा रोडवरील महेश ढाबा जवळील मिहान उड्डाणपुला जवळून मिहान परिसरात जाईल. परतीचा मार्ग मिहान उड्डाणपुल ओलांडुन पहीले डावे वळन घेवून पुन्हा डावे वळन घेवून सरळ वर्धा रोडने पुढे प्रस्थान करावे.

## फ) नरेन्द्र नगर भुयारी मार्गाजवळील कंटेनर डेपो अजनी :–

• **भंडारा, जबलपुर कडून शहरात प्रवेश करून नरेन्द्र नगर भुयारी मार्गाजवळील कंटेनर डेपो** या ठिकाणी येणारी जडवाहने आऊटर रिंगरोड मार्गे कापसी पुलीया येथून, नविन पारडी नाका, सरळ नवीन उड्डान पुलावरून डावे वळन घेवून संघर्ष नगर चौक, खरबी चौक, चामट चक्की चौक सरळ मानेवाडा चौक नरेंद्र नगर चौक डावे वळन घेवून उड्डान पुलावरून कोकाकोला चौक उजवे वळन घेवून छत्रपती चौकातून उजवे वळन घेवून नरेन्द्र नगर पुला खालुन जावून डावीकडे कंटेनर डेपो जातील.

• **अमरावती, वर्धा, उमरेड, कडून शहरात प्रवेश करून नरेन्द्र नगर भुयारी मार्गाजवळील कंटेनर डेपो** या ठिकाणी येणारी जडवाहने आउटर नवीन रिंगरोडने गोंडखैरी टी पॉईंट समृध्दी झिरो सर्कल वरून माउली कटिंग येथुन डावे वळण घेवुन रानी कोठी, चिंचभवन बस स्टॉप, हॉटेल प्राईड चौक, कोकाकोला चौक, छत्रपती चौकातून उजवे वळन घेवून नरेन्द्र नगर पुला खालुन जावून डवीकडे कंटेनर डेपो जातील. किंवा अमरावती व वर्धा कडून येणारी जडवाहने खालील वेळेत मार्गाचा वापर करतील. तसेच वर्धा कडुन येणारी जड वाहतूक वरील मार्गाचा वापर करतील.तसेच उमरेड कडुन येणारी जड वाहन उमरगाव नंतर डावे वळण घेवुन हैद्राबाद आउटर रिंगरोड वरून पांजरी टोल नाका, माऊली कटिंग येथुन डावे वळण घेवुन आक्सीजन बर्ड पार्क येथुन डावे वळण घेवुन राणी कोठी वरून उपरोक्त मार्गाचा वापर करून कंटेनर डेपो येथे जातील.

• **भोपाल व छिंदवाडा कडून शहरात प्रवेश करून नरेन्द्र नगर भुयारी मार्गाजवळील कंटेनर डेपो** या ठिकाणी येणारी जडवाहने कोराडी पॉवर हाऊस येथुन उजवे वळण घेवुन नविन आउटर रिंग रोड वरून गोंडखैरी टी पॉईंट समृध्दी झिरो सर्कल वरून माउली कटिंग येथुन डावे वळण घेवुन रानी

कोठी, चिंचभवन बस स्टॉप, हॉटेल प्राईड चौक, कोकाकोला चौक, छत्रपती चौकातून उजवे वळन घेवून नरेन्द्र नगर पुला खालुन जावून डवीकडे कंटेनर डेपो जातील.

- **कंटेनर डेपोतून परत जाणारी जड वाहने कंटेनर डेपोतून येथून निघुन डावे वळन घेवून नरेंद्र नगर चौकातून मानेवाडा रोडने किंवा उजवे वळण घेवुन कोकाकोला चौकातून डावे वळण घेवुन वर्धा रोड मार्गे पुढे परत जातील.**

- फ मध्ये नमुद **मार्गाने आवगमन करणारे वाहतूकीस रात्री 12:00 वा पासून ते सकाळी 05:00 वा. पर्यत प्रवेश राहील. इतर वेळी प्रवेश बंदी राहील.**

**ज) खालील नमूद मार्गावर 06.00 वा. ते 12.00 वा. आणि 16.00 वा.ते 22.00 वाजेपर्यत कोणत्याही जड वाहनांना जाण्यांस प्रतिबंध राहील. मात्र पेट्रोल, डिझेल, गॅस सिलेंडर, दुध यासारख्या जिवनावश्यक वस्तुंचा शहरात पुरवठा करणाऱ्या वाहनांना तसेच इतर आपातकालीन परीस्थितीत मदत पुरविणाऱ्या जड वाहनांना हा प्रतिबंध लागू राहणार नाही.**

1) रेसीडेंसी रोड – छावणी वाय पॉईटं ते लिबर्टी टॉकीज.

2) माऊंट रोड – कॉफी हाऊस चौक ते नायडू हॉस्पीटल चौकापर्यंत

3) वेस्ट हायकोर्ट रोड – जपानी गार्डन ते लक्ष्मीनगर चौक

4) मॉरिस कॉलेज टी पॉईन्ट ते रहाटे कॉलनी.

5) सिताबर्डी मेन रोड –व्हेरायटी चौक ते लोखंडी पुलापर्यत

6) मालविय रोड – झाशीराणी चौक ते लोखंडी पुलापर्यत

7) जयस्तंभ चौक ते सोना रेस्टारेंट चौका पर्यत.

8) इंदोरा रोड – इंदोरा चौक ते चिटनिस पार्कपर्यत

9) जुना भंडारा रोड – मेयो हॉस्पीटल चौक ते जूना मोटार स्टॅन्ड चौकापर्यंत

10) केळीबाग रोड – बडकस चौक ते महाल चौकापर्यंत, महाल चौक ते गांधीगेट बडकस चौक ते नातीक चौक

11) रायफल रेंज रोड – रामगिरी बंगला ते पीडब्ल्यूडी चौक (पोलीस जिमखाना) पर्यंत.

12) दहीबाजार रेल्वे उड्डानपुल ( या उड्डानपुलावरुन आपातकालीन वाहने व एस. टी.महामंडळाच्या बसेस वगळता इतर जड वाहनांना प्रवेश राहणार नाही)

**ग)** भवन निर्माण सामुग्री शहरात पुरवठा करणारे, रस्त्याचे डांबरीकरण, कॉक्रेटीकरण, रूंदीकरणाचे कामासाठी तसेच मिहान प्रकल्प त्याचप्रमाणे मेट्रो प्रकल्पाचे कामासाठी वापरण्यात येणा–या जड वाहनांव्दारे मटेरीयल सप्लाय करणारे वाहनांना ''ज'' मध्ये नमुद मार्ग सोडून शहरातील सर्व ठिकाणी सकाळी 06:00 वा.ते 22:00 वा. पावेता प्रवेश बंदी राहील. **बंदी असलेल्या वेळेत त्यांना शहरात प्रवेश करणे आवश्यक असल्यास त्यांना पोलीस उप आयुक्त, वाहतूक यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील.**

**घ) :– 1) प्रादेशिक परिवहन कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर शहर** येथे वाहन पासींग करिता जाणाऱ्या जडवाहनांना सकाळी 10.00 ते सायंकाळी 18.00 वाजेपर्यंत गोंडखैरी टी पॉईंट येथुन अमरावती रोड ने वाडी टी पॉईंट, कॅम्पस चौक, लॉ कॉलेज चौक ते आरटीओ कार्यालय व परत त्याच मार्गाने जाण्या–येण्याचे जड वाहनांना परवानगी राहील. परतीचा मार्ग याचप्रमाणे राहील.

**2) प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर ग्रामीण, कामठी रोड (लालगोदाम)** येथे वाहन पासींग करिता जाणाऱ्या जडवाहनांना सकाळी 10.00 वा. ते सायंकाळी 18.00 वा. खैरीगाव कामठी रोड वरून डावे वळण घेवुन कामठी रोडने भिलगाव, नाका नं. 2 सरळ आटोमोटीव्ह चौक, कपीलनगर चौक, तथागत चौक डावे वळन घेवून पाटनकर चौक मार्गे जातील. परतीचा मार्ग याचप्रमाणे राहील.

**3) प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर पुर्व (एम.एच.49) चिखली** येथे वाहन पासींग करिता जाणाऱ्या जडवाहनांना सकाळी 10.00 वा. ते सायंकाळी 18.00 वा. खैरीगाव कामठी रोड वरून डावे वळण घेवुन कामठी रोडने भिलगाव, नाका नं. 2 सरळ आटोमोटीव्ह चौकाकतून सरड कळमना उड्डान पुलावरून चिखली चौक मार्गे जाईल किंवा जुना पारडी नाका चौकातून चिखली चौक मार्गे जातील. परतीचा मार्ग याचप्रमाणे राहील.

**च) शहरातील गॅरेजेस व व्यापारी आस्थापना येथे दुरूस्ती करीता व माल घेवून येणारे जड वाहने, तसेच नागपुर शहरातील विकास कामांकरीता येणारी जड वाहने या अधिसुचनेत नमूद मार्गाने शहरात प्रवेश करून त्यांचे ठिकाणी जाणे व येणेकरीता दिवसा 12.00 ते 16.00 वा व रात्री 10:00 वा. ते सकाळी 06:00 वा. पर्यंत परवानगी देण्यात येत आहे.**

## छ) नमूद अधिसूचनेतील प्रतिबंध खालील जड वाहनांना लागू राहणार नाही.

1) केन्द्र शासन व राज्य शासन, नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हा परिषद किंवा इतर महामंडळाच्या मालकीची शासकीय कामासाठी फिरणारी वाहने.

2) अग्नीशमन दल, सैन्य दल तसेच केन्द्र व राज्य शासनाचे पोलीस दलाचे जडवाहन.

3) केन्द्र शासन, राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था व महामंडळे यांचेद्वारे शासकीय कामात कायदेशीररित्या गुंतलेली खाजगी जड वाहने.

4) दुध, पेट्रोल, डिझेल, केरोसीन, गॅस यासारख्या जीवनावश्यक वस्तुचा नागपूर शहरात पुरवठा करणारी जडवाहने. (मात्र शहरा बाहेरून माल आणून शहरा बाहेर माल पुरवणारी अशी वाहने फक्त आऊटर रिंग रोडचाच वापर करतील.)

5) प्रवाशी वाहतुक करणारी शासकिय, सार्वजनिक वाहने.

6) शासकीय कामात गुंतलेल्या जड वाहनांच्या चालकावर संबंधीत कार्यालयीन प्रमुखाचे मुळ स्वरुपातील प्रमाणपत्र बाळगण्याची तसेच वाहनासमोर “ON GOVT DUTY“ असा फलक लावण्याची अट राहिल.

**ज) जडवाहना चे ट्रक ओनर्स, ट्रक असोसिएशन व चालक यांना वाहतूक करतांना खालील दिलेल्या सुचनाचे पालन करणे आवश्यक आहे.**

**1)** ट्रक चालकांनी त्यांचे ट्रक रोडने डाव्या बाजूचे लेन ने रोडचे कडेकडून चालवतील. व रोडचे डिव्हायडर कडील बाजू मोकळी ठेवतील.

2) **ट्रक चालकाने त्यांचे ट्रक हे नागपूर शहराचे हद्दीतून ताशी 30 कि.मी. प्रति वेगाने एका पाठोपाठ एक डावे लेनमधूनच रोडचे कडेने चालवतील.**

3) ट्रक ओनर्स ॲन्ड ब्रोकर असोसिएशन, नागपूर, नागपूर लोकल ट्रक ओनर्स असोसिएशन, नागपूर ट्रकर्स युनिटी व इतर ट्रान्सपोर्ट ओनर्स यांना सुचना देण्यात येते की, त्यांनी ट्रक चालकांना वरील अटीप्रमाणे सुचनाचे काटेकोरपणे पालन करण्याकरीता सुचना देतील.

4) नागपूरच्या कार्यक्षेत्राशी काहीही संबंध नसलेल्या अनेक वाहनांनी, शार्टकट घेण्यासाठी किंवा टोल भरणे टाळण्यासाठी नागपूर शहरातील रस्ते ओलांडणे सुरू केले आहे. त्याच वेळी नागपूर मध्ये काम असलेल्या जड वाहनांच्या मालकांनी दुपारी 12.00 वा. 16.00 वा. या वेळेत प्रवेश मिळावा, अशी मागणी केली आहे. या दोन्ही मुद्दयांचा विचार करून, अशा वाहनांनाच 12.00 वा. ते 16.00 वा. या वेळेत प्रवेश दिला जाईल ज्यांनी आपल्या प्रवेशाबाबत आगाऊ माहिती ईमेलद्वारे dcptraffic.ngp@mahapolice.gov.in या ईमेलवर दिली आहे, किंवा ज्यांच्याकडे नागपूरमधील विकासकामाचे पुरावे (दस्तऐवज) आहेत.

5) **नागपुर शहरात प्रवेश करणे करीता दिलेल्या वाहन धारकांनी दुपारी 12.00 वा. ते 16.00 वा. पर्यंत व 22.00 वा. ते 06.00 वा. पर्यंत याव्यतिरीक्त कोणतेही जड वाहन आवगमन करीत दिसल्यास त्या वाहनावर कारवाई करून जप्त करण्यात येईल.**

6) **एम.आय.डी.सी परिसरात प्रवेश केलेल्या जड वाहनांना, परवानगी दिलेल्या वेळेशिवाय रिकाम्या अवस्थेत 16.00 वा. ते 18.00 वा. या वेळेत नागपूर मधुन बाहेर जाण्यास परवानगी असेल.**

7) **वरील व्यतिरिक्त, सकाळी 06.00 वा. ते 12.00 वा. वेळेत तसेच 16.00 वा. ते 22.00 वा. या वेळेत आउटर रिंगरोडच्या आत नागपूरच्या रस्त्यांवर जड वाहने चालविण्यास मनाई राहील. या वेळेत फिरतांना आढळणाऱ्या वाहनांना परवानगीच्या वेळेपर्यंत तात्पुरते ताब्यात ठेवले जाईल व मोटार वाहन अधिनियम, 1988 च्या कलम 184 व 179 अन्वये अनुक्रमे 10000/— रू व 750/—रू दंड करण्यात येईल.**

**सदर अधिसुचना दि. 08/10/2025 ते पुढील आदेशापर्यंत अमंलात राहील.**

तरी सर्व वाहन चालकांनी अधिसुचनेचे पालन करून वाहतूक पोलीस विभागास सहकार्य करावे.

**स्वा/-**
( **लोहित मतानी, भापोसे** )
पोलीस उप आयुक्त,वाहतुक,
नागपूर शहर